# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## अधिसूचना (प्रारुप)

### विद्युत अधिनियम, २००३

**क्र.मविनिआ/तांत्रिक/विनियम/--- –** विद्युत अधिनियम, २००३ च्या (२००३ चा ३६) कलम ६१ आणि कलम ८६ (३) सह कलम १८१ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि वीज दर धोरण, २०१६ च्या खंड ५.३ च्या अनुषंगाने तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन आणि पूर्व प्रसिध्दीनंतर, 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६'सह , 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) (पहिली सुधारणा) विनियम, २०१९' (**'मुख्य विनियम'**) या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

**प्रस्तावना**

विद्युत अधिनियम, २००३ ('वि. अ. २००३' किंवा 'अधिनियम')च्या कलम ८६(१)(इ) नुसार, राज्य विद्युत नियामक आयोगावर ('एसइआरसी' किंवा 'आयोग') ग्रीडशी जोडणीयता देण्यासाठी आणि कोणत्याही व्यक्तीस विजेची विक्री करण्यासाठी सुयोग्य उपाययोजना प्रदान करुन नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्याचे कार्य नेमून देण्यात आले आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३० मार्च, २०१६ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि दि. ०८ जून, २०१९ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) (पहिली सुधारणा) विनियम, २०१९ अधिसूचित केले आहेत. त्यानंतर, ऊर्जा मंत्रालयाने विद्युत (हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाद्वारे नूतनशील ऊर्जेस प्रोत्साहन) नियम, २०२२ मध्ये अधिसूचित केलेल्या पहिल्या आणि दुसऱ्या सुधारणांसह काही क्षेत्रीय घडामोडी घडल्या आहेत. हे बदल महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश)(दुसरी सुधारणा) विनियम, २०२३ मध्ये समुचितपणे समाविष्ट करण्यात आले आहेत.

**२. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ**

२.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश)(दुसरी सुधारणा) विनियम, २०२३" असे म्हणावे.

२.२ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

## २. मुख्य विनियमांचा भाग ए : प्रारंभिक मधील विनियम २ मध्ये सुधारणा :-

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(७) नंतर २.१(७)(ए) ची भरः-**

"२.१(७)(ए) **"केंद्रीय नोडल एजन्सी"** म्हणजे केंद्र सरकारने नूतनशील ऊर्जेसाठी एकल खिडकी हरित ऊर्जा मुक्त प्रवेश यंत्रणेची स्थापना आणि संचालन करण्यासाठी अधिसूचित केलेली नोडल एजन्सी होय."

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(१९) नंतर २.१(१९)(ए) आणि २.१(१९)(बी) ची भरः-**

"२.१(१९)(ए) **"एन्टीटी"** म्हणजे स्व-वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचा उपयोगकर्त्या व्यतिरिक्त (कॅप्टिव्ह युजर), कोणताही असा ग्राहक ज्याची करारबध्द मागणी किंवा मंजूर भार, कोणत्याही वितरण परवानाधारकाच्या एकाच विद्युत विभागामध्ये स्थित असलेल्या बहुविध जोडण्यांच्या माध्यमातून शंभर किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक आहे.

परंतु असे की, कॅप्टिव्ह उपयोगकर्त्याच्या बाबतीत, कोणतीही भार मर्यादा असणार नाही.

२.१(१९)(बी) **"नियामकांचा मंच"** म्हणजे अधिनियमांच्या कलम १६६ च्या उप-कलम(२) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे असलेला मंच होय."

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (३२) खालीलप्रमाणे बदलण्यात येईलः**

२.१ (३२) **"नूतनशील ऊर्जा" / "हरित ऊर्जा"** म्हणजे जल आणि जलसाठ्यासह (नूतनशील ऊर्जेसाठी जलसाठ्याचा वापर केल्यास) किंवा भारत सरकारकडून वेळोवेळी अधिसूचित केलेल्या अन्य कोणतेही तंत्रज्ञानासह नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनची विद्युत ऊर्जा, आणि त्यामध्ये जीवाश्म इंधनाऐवजी, केंद्र सरकारकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे अन्य कोणत्याही स्त्रोतानुसार, हरित हायड्रोजन किंवा हरित अमोनियासह हरित ऊर्जेचा वापर करण्यात आलेल्या कोणत्याही तंत्राचा देखील समावेश असेल.

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(३२) नंतर २.१(३२)(ए) ची खालीलप्रमाणे भरः-**

२.१(३२)(ए) **"नियम"** म्हणजे विद्युत (हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाद्वारे नूतनशील ऊर्जेचे संवर्धन) नियम, २०२२ आणि त्यामध्ये त्यानंतर करण्यात आलेल्या सुधारणा होय.

**मुख्य विनियमांच्या विनियम ३ मध्ये सुधारणाः**

**मुख्य विनियमांच्या विनियम ३.२ चे दुसरे आणि आठवे परंतुक रद्द करण्यात येते.**

**मुख्य विनियमांच्या विनियम ३.२ नंतर विनियम ३.३ आणि ३.४ ची भरः-**

"३.३ विनियम ३.२ मध्ये कोणतीही तरतूद असली तरी, १०० किलोवॅट किंवा त्यापेक्षा जास्त किंवा नियमांमध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणांनुसार करारबध्द मागणी किंवा मंजूर भार असलेला ग्राहक, किंवा वितरण परवानाधारकाच्या एकाच विद्युत विभागामध्ये स्थित असलेल्या बहुविध जोडण्यांच्या माध्यमातून १०० किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक करारबध्द मागणी किंवा मंजूर भार असलेली एन्टीटी, मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून हरित ऊर्जेपासून वीज घेण्यास पात्र राहील.

परंतु असे की, हरित ऊर्जा मुक्त प्रवेशा अंतर्गत वीज घेणा-या कॅप्टिव्ह उपयोगकर्त्यांसाठी विजेच्या पुरवठ्याची कोणतीही मर्यादा असणार नाही.

परंतु आणखी असे की, नूतनशील ऊर्जा निर्मात्यांकडून वीज घेणा-या मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी विनियम ३.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या करारबध्द मागणीची किंवा मंजूर भाराची मर्यादा लागू राहणार नाही, परंतु विनियम ८.१० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिणामस्वरुप निर्माण होणा-या विद्युत प्रवाहाच्या अटींच्या अधीन असेल.

परंतु आणखी असे की, बहुविध जोडण्यांच्या बाबतीत हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाच्या प्रारंभापूर्वी, ग्राहक वितरण परवानाधारकास हरित ऊर्जा प्रकल्पामधून प्रत्येक जोडणीला होणा-या ऊर्जा निर्मितीच्या टक्केवारीबाबत आगाऊ कळविल, जेणेकरुन वितरण परवानाधारकाला त्याचा उचित हिशोब ठेवणे शक्य होईल.

परंतु आणखी असे की, हरित ऊर्जा मुक्त प्रवेश ग्राहक किमान बारा-काल गटांसाठी मुक्त प्रवेशाद्वारे वापरलेल्या विजेच्या प्रमाणामध्ये बदल करणार नाहीत."

३.४ विनियम ३.२ किंवा ३.४ मधील, जसे असेल तसे, पात्रता निकष पूर्ण करण्याच्या अधीन राहून, छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा असणारा ग्राहक या विनियमांतर्गत एकाच वेळी मुक्त प्रवेश प्राप्त करू शकतो.

**मुख्य विनियमांच्या विनियम ४ मध्ये सुधारणाः**

**मुख्य विनियमांच्या विनियम ४.१ मध्ये ३-या परंतुकाची भरः-**

"परंतु आणखी असे की, केंद्रीय नोडल अभिकरणाने नियमांतील तरतुदींनुसार तयार केलेली कार्यपध्दती आणि नमुने हरित ऊर्जा मुक्त प्रवेश मागण्यासाठी अवलंबण्यात येतील."

**मुख्य विनियमांच्या विनियम ८ मध्ये सुधारणाः**

**मुख्य विनियमांच्या विनियम ८.१ च्या दुस-या परंतुकानंतर ३, ४ आणि ५ व्या परंतुकांची भरः**

“परंतु आणखी असे की, केंद्रीय नोडल अभिकरणाने नियमांतील तरतुदींनुसार तयार केलेले नमुने आणि वेळापत्रकाचे अनुसरण हरित ऊर्जा मुक्त प्रवेश मागण्यासाठी करण्यात येईल.

परंतु असेही की, अल्प-कालिन हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र आणि मध्यम/दीर्घ कालिन हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाच्या बाबतीत राज्य पारेषण कंपनी, केंद्रीय नोडल अभिकरणाने तयार केलेल्या कार्यपध्दतीमध्ये ठरवून दिल्याप्रमाणे नोडल एजन्सी म्हणून काम करेल.

परंतु असेही की, संबंधित वितरण परवानाधारक, केंद्रीय नोडल अभिकरणाने हरित मुक्त प्रवेशासाठी तयार केलेल्या नियम आणि कार्यपध्दतीमध्ये ठरवून दिलेल्या वेळापत्रकाचे पालन करणे शक्य होण्यासाठी, नोडल अभिकरणाला आवश्यक तो सर्व तपशील पुरविल.”

**मुख्य विनियमांच्या विनियम १४ मध्ये सुधारणाः**

**मुख्य विनियमांच्या विनियम १४.७(ड)च्या पहिल्या परंतुकानंतर २, ३ आणि ४ व्या परंतुकांची भरः**

“परंतु आणखी असे की, नूतनशील ऊर्जा स्त्रोतांचा वापर करुन निर्मिती प्रकल्पामधून हरित ऊर्जा खरेदी करणा-या हरित ऊर्जा मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी क्रॉस सबसिडी अधिभार, नूतनशील ऊर्जा स्त्रोतांचा वापर करुन निर्मिती प्रकल्प कार्यान्वित केल्याच्या दिनांकापासून बारा वर्षांदरम्यान, ज्या वर्षी मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला त्या वर्षीसाठी निश्चित केलेल्या अधिभाराच्या पन्नासा टक्क्यांपेक्षा जास्त वाढणार नाही.

परंतु असेही की, अ-खनिज (गैर-जीवाश्म) इंधनावर आधारित कच-यापासून विद्युतनिर्मिती करणा-या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज मुक्त प्रवेश ग्राहकांना पुरविल्यास क्रॉस सबसिडी अधिभार लागू राहणार नाही.

परंतु असेही की, हरित ऊर्जेचा वापर हरित हायड्रोजन आणि हरित अमोनियाच्या उत्पादनासाठी करण्यात येत असेल तर क्रॉस सबसिडी अधिभार लागू होणार नाही.”

**मुख्य विनियमांच्या विनियम १४.८(ड) च्या पहिल्या परंतुकानंतर २, ३ आणि ४ थ्या परंतुकांची भरः**

"परंतु आणखी असे की, अ-खनिज (गैर-जीवाश्म) इंधनावर आधारित कचऱ्यापासून विद्युतनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज मुक्त प्रवेश ग्राहकांना पुरविल्यास अतिरिक्त अधिभार लागू राहणार नाही.

परंतु असेही की, हरित ऊर्जेचा वापर हरित हायड्रोजन आणि हरित अमोनियाच्या उत्पादनासाठी करण्यात येत असेल तर अतिरिक्त अधिभार लागू होणार नाही.

परंतु आणखी असेही की, डिसेंबर, २०३२ पर्यंत कार्यान्वित झालेल्या आणि मुक्त प्रवेश ग्राहकांना वीज पुरवठा केलेल्या, किनाऱ्यापासून दूर असलेल्या पवन प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेच्या बाबतीत अतिरिक्त अधिभार लागू होणार नाही."

**मुख्य विनियमांच्या विनियम १७ मध्ये सुधारणाः**

**मुख्य विनियमांच्या विनियम १७.१च्या दुस-या परंतुकांची भरः**

"परंतु आणखी असे की, १ मेगावॅट पेक्षा कमी करारबध्द मागणी असलेल्या ग्राहकांना हरित ऊर्जा मुक्त प्रवेशास टीओडी मीटरच्या आधारावर परवानगी देण्यात येईल."

**मुख्य विनियमांच्या विनियम २० मध्ये सुधारणाः**

**मुख्य विनियमांचा विनियम २०.४ खालीलप्रमाणे बदल :**

"२०.४ बॅन्किग आकार बॅन्क्ड केलेल्या ऊर्जेच्या ८ टक्के प्रमाणात समायोजित करण्यात येतील."

**मुख्य विनियमांचा विनियम २०.५ खालीलप्रमाणे बदल :**

"२०.५ न वापरलेली शिल्लक बॅन्क्ड ऊर्जा प्रत्येक बॅन्कीग चक्राच्या शेवटी व्यपगत म्हणून विचारात घेण्यात येईल.

परंतु असे की, नूतनशील ऊर्जा निर्मिती केंद्राला व्यपगत झालेल्या बॅन्क्ड ऊर्जेच्या मर्यादेपर्यंत नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क राहील."

मुंबई,
दिनांक : ऑगस्ट, २०२३

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग